PARLE **MAHOTSAV**

Organiser - **ADV. PARAG ALAVANI,** President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahostav.com

PARLE **MAHOTSAV**

**<u>कृपया प्रसिद्धीकरिता</u>**

# १४ व्या पार्ले महोत्सवाच्या कला परिसर 'स्वर्गीय विनय आपटे कला नगरीचे' उद्‌घाटन

## स्वर्गीय विनय आपटे प्रमाणाचे चांगले कलाकार घडोत - विक्रम गोखले

**दि. २५.१२.२०१३**

मुंबईः स्वर्गीय विनय आपटे प्रमाणाचे चांगले कलाकार घडोत अशा शुभेच्छा पार्ले महोत्सवाच्या व्यासपीठावरुन जेष्ठ अभिनेते विक्रम गोखले यांनी दिल्या. १४ व्या पार्ले महोत्सवमधील चित्रकला, व्यंगचित्र, गायन, नृत्य, समूह नृत्य, मेहंदी, वकृत्व, एकपात्री प्रयोग, स्वरचित काव्यवाचन इत्यादी कलाविषयक स्पर्धा होत असलेल्या साठ्ये महाविद्यालयातील परिसरास स्वर्गीय विनय आपटे कलानगरीचे उद्‌घाटन करताना ते बोलत होते. चांगले कलाकारसह मुलांनी देशाचे चांगले नागरिक व्हावे. यासाठी पार्ले महोत्सवांनी काही केले पाहिजे, अशा अपेक्षाही त्यांनी व्यक्त केल्या. स्व. विनय आपटे हे चांगले अभिनेते व दिग्दर्शक तर होतेच पण एक सच्चे देशभक्तही होते याची त्यांनी आठवण करुन दिली.

या प्रसंगी बोलताना सुप्रसिध्द अभिनेते व तारक मेहता का उलटा चष्मामधील 'जेठालाल' श्री. दिलीप जोशी यांनी आपण मागील सर्व वर्षी पार्ले महोत्सवमध्ये आलो असून उत्तरोत्तर हा महोत्सव भव्य होत चालला आहे. येथे आलेल्या टप्पू सेने सोबतही त्यांनी सवांद साधला. आजच्या स्पर्धांमध्ये भाग तर घ्याच पण आयुष्यातील सर्व स्पर्धांमध्ये आपण यशस्वी व्हा, असे आर्शिवादही त्यांनी दिले.

बॅडमिंटन स्पर्धेच्या उद्‌घाटनासाठी २० वे जागतिक सिडींग व भारताचे दुसरे सिडींग प्राप्त असलेला बॅडमिंटनपट्टू हर्षील दाणी याने सर्व खेळाडूंना "बक्षिसासाठी नव्हे तर आपला खेळ चांगला करण्यासाठी प्रयत्नशील रहा." असे सांगितले. आपण स्वत: ४थ्या व ५व्या पार्ले महोत्सवामधील स्पर्धक होतो, मात्र तेव्हा बक्षिस मिळाले नव्हते अशी आठवण त्याने आवर्जुन सांगितली. सारस्वत बॅंकेच्या पार्ले शाखेचे ब्रॅंच मॅनेजर श्री.मंगेश नाडकर्णी यांनीही पार्ले महोत्सवातील सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

५ व्या दिवशी महोत्सवामध्ये 'भारत को जानो' ही देशावरील आधारीत प्रश्नमंजुषा तसेच योग विद्या, जेष्ठ नागरिक स्पर्धा या आगळ्या वेगळ्या स्पर्धा सुरू झाल्या, तर चित्रकला, व्यंगचित्र, टेबल टेनिस, खो-खो अशा स्पर्धाही सुरू झाल्या. पाचव्या दिवस अखेर सुमारे १० ते १२ हजार स्पर्धक महोत्सवामध्ये सहभागी झाले होते. अहमदनगरहून आलेल्या ५० विशेष मुले, अत्यंत देखणे झालेल्या योगा स्पर्धा, बॅडमिंटन स्पर्धेत सहभागी झालेला चिन्मय मिर्जी हा विशेष मुलगा यांनी सर्वच प्रेक्षकांची मने जिंकली.

---

सदर पत्रक श्रीकृष्ण आंबेकर, कार्यालय प्रमुख, पार्ले महोत्सव यांनी प्रसिद्ध केले आहे.

# PARLE **MAHOTSAV**

Organiser - **ADV. PARAG ALAVANI,** President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahostav.com

PARLE **MAHOTSAV**

PARLE **MAHOTSAV**